**तक्रारदारतर्फे स्वतःची** शपथेवर जबानी.
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,
माझे नाव : उमेश शेषराव काळे,
वय : ३४ वर्षे, धंदा – नोकरी,
व्यवस्थापक, नवनिर्माण नागरी पत स्स्था, सावनेर.

<u>सरतपासणी</u>

(**तक्रारदारतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.डी.मेटकर** )

०१. आरोपी आमच्या पत संस्थेचा सभासद आहे. मी आरोपीच्या संस्थेतील खात्याचा उतारा दाखल केला आहे. आता मला आरोपीचे खाते क्रमांक २१२२ चा उतारा दाखविण्यात आला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे, संस्थेचा शिक्का आहे. तो खाते उतारा मी संस्थेच्या संगणकावरुन मुद्रांकित केला आहे. त्या संगणकावर आमच्या संस्थेच सर्व अभिलेख संरक्षित आहेत. त्यामध्ये दैनंदिन कामाचा भाग म्हणून खात्यावरी व्यवहारांची नोंदी घेतल्या जात असतात. तो खाते उतारा मी मुद्रांकित केल्याबद्दल भारतीय पुरावा कायदा कलम ६५–बी अन्वये वेगळे प्रमाणपत्र देखील जोडले आहे. आता मला ते प्रमाणपत्र दाखविले, हे तेच आहे. त्यातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही व संस्थेचा शिक्का आहे. खाते उतारा व प्रमाण्पत्रास अनुक्रमे **नि.क्र. २९–अ व २९–ब** देण्यात आला.

सरतपास संपूर्ण

**<u>उलट तपास आरोपीतर्फे स्वतःमार्फत सुरु.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्या संस्थेतून कर्ज घेतले नाही.

आम्ही कर्जाची रक्कम कर्जधारकाच्या खात्यावर जमा करतो अथवा त्याला धनादेशाद्वारे अदा करतो. आरोपीला दिलेले कर्ज त्याच्या बचत खात्यामध्ये वर्ग करण्यात आले आहे. तशी नोंद दिनांक ०१.०६.२०१५ रोजीच्या व्यवहारामध्ये दिसून येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१.०६.२०१५ रोजी आरोपीच्या खात्यात अशी कोणतीही रक्कम वर्ग करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपी आमच्या संस्थेची कोणतीही रक्कम देयक लागत नाही.

०३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दैनिक बचत ठेवमध्ये भरणा केलेली रक्कम त्याला अदा करण्यात आली व कर्जाची रक्कम कधी देण्यात आली नाही.

**उलटतपास संपूर्ण.** **फेर तपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

sd/–
( स.र.भरड )

दिनांक १७.०१.२०२५

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
सावनेर

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P. D. F. File of Evidence is word to word as per original Evidence."

Name of Stenographer : S. A. Misal